नि.दि.दावा क्र.५५/२०१९

मिराबाई वि. गोविंद

**निशाणी क्रं. ३३**

**<u>प्रतिवादीतर्फे सा.क्र. ०३ विठ्ठल मोहन गोमलाडू यांचा उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.आर.टी.बावसकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

माझे १२ वी पर्यंत शिक्षण झाले. मी सोसायटीचा चेअरमन आहे. मी वेगवेगळ्या प्रक्षाकडून राजकारण करतो. माझे प्रतिवादीसोबत चांगले सबंध आहेत. मी आज प्रतिवादी क्र. १ सोबत न्यायालयात आलो. मी शपथपत्र दाखल केले तेव्हा प्रतिवादी क्र. १ सोबत न्यायालयात आलो होतो. रामकोरबाईने वादीला खरेदीखत करुन दिले त्यावर माझी सही नाही. मी ते खरेदीखत पाहिले नाही. खरेदीखत कधी झाले हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, रामकोरबाइने वादी विरुध्द कोणताही फोजदारी दावा दाखल केला नाही. मी वादजमिनीचा ७/१२ पाहिला आहे. वादातील जमीन ही वादीच्या नावावर आहे. मी बैठक घेतली ती तारीख सांगू शकत नाही. मी त्याबैठकीत कागदोपत्री लिहून घेतलेले नाही.

०२. माझ्या शेताचा गट नं. ८४ असून पळसगांव शिवारात आहे. मला वाद जमिनीचा गट नंबर सांगता येणार नाही. वादजमिन पिंप्री शिवारात आहे. हे म्हणणे खरे नाही की, बांधाला बांध आहे हा शपथपत्रातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीसोबत संबंध चांगले असल्याने खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र दाखल केले.

**उलटतपास पूर्ण.**

Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2026.01.14 17:27:24 +0530

(**जी.डी. गुरनुले**)

दिनांक–१४.०१.२०२६.

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,खुलताबाद.